# विद्यापीठातील ग्रंथालये, अभ्यासिका सुरू करा

## स्टुडंट फेडरेशनचे कुलगुरूंना निवेदन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील कॅम्पसमधील सर्व ग्रंथालय व अभ्यासिका सुरू कराव्यात, अशी मागणी ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन, ऑल इंडिया यूथ फेडरेशनच्या शिष्टमंडळाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सरकारने ग्रंथालये सुरू करण्याचा आदेश दिला आहे. संशोधक विद्यार्थी लॉकडाऊनमुळे गावी गेले असून त्यांचे काम ठप्प आहे. विद्यार्थ्यांना खासगी अभ्यासिकेत पैसे देऊन अभ्यास करावा लागत आहे. संशोधक विद्यार्थ्यांसाठी नियमित वसतिगृह आणि नूतन वसतिगृह इमारत चालू करावी. संशोधक विद्यार्थ्यांची इतर कामे नोंदणी व्हायवा, गाईड, अलाटमेंट कामे करावीत. स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे व्याख्याने आयोजित करावीत, आदी मागण्या करण्यात आल्या. यावर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी या मागण्या योग्य व विद्यार्थी हिताच्या आहेत, त्याचा सकारात्मक विचार करू, असे आश्वासन दिले. यावेळी गिरीश फोंडे, प्रशांत आंबी, आरती रेडेकर, सुरेश कोकरे, राकेश बावडेकर, अमर कोल्हापुरे उपस्थित होते.